तरुण भारत ▪ सोमवार, १० फेब्रुवारी २०२०

# हळबे महाविद्यालयात संविधान जागर कार्यक्रम

**दोडामार्ग :** आजच्या अस्थिर राजकीय परिस्थितीत प्रत्येक तरुणाला आपले हक्क व कर्तव्य यांची नव्याने ओळख करून दिली पाहिजे. भारत हा विविध जाती, धर्म असलेला देश आहे. विविधतेत एकता व धर्मनिरपेक्षता हे आपल्या घटनेचे वैशिष्ट्य आहे. एक आदर्श देश निर्माण करण्यासाठी आदर्श नागरिक बनणे आवश्यक असते. मात्र, त्यासाठी प्रत्येकाने भारतीय संविधान जाणून घेणे आवश्यक आहे. ती काळाची गरज आहे, असे विचार राष्ट्रसेवा दलाचे राष्ट्रीय सचिव अल्लाउद्दीन शेख यांनी व्यक्त केले. दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित 'संविधान जागर' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी शेख बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. एस. यू. दरेकर, पर्यावरणप्रेमी हरीहर वाटवे, डॉ. पी. डी. गाथाडे, योगेश ठाकुर उपस्थित होते. शेख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा ही परिचय विद्यार्थ्यांना करून देताना त्यांना घटनेचे शिल्पकार का म्हटले जाते हे सांगितले. महाविद्यालयाचे प्रा. दरेकर यांनी प्रथम प्रमुख उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. दरेकर यांनी घटनेचे महत्व, आपले अधिकार व कर्तव्य याबद्दल माहिती दिली. हरीहर वाटवे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले, तर आभार एस. एस. पाडगावकर यांनी मानले.

Scanned by CamScanner